**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क. : नाविमं / प.उ.मा. / 525
नागपूर, दि. 06/02/2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग नागपूर.
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

**विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा फेब्रुवारी– मार्च 2025 शिक्षासूची वाचनाबाबत.**

**संदर्भ : –1) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क. / परीक्षा–8 / 386, दिनांक 28 / 01 / 2025.**

उपरोक्त विषयाचे संदर्भात सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षांचे आयोजन फेब्रुवारी–मार्च 2025 मध्ये करण्यात आलेले आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे आणि परीक्षेशी संबंधीत घटकांच्या वैचारिक मनोवृत्तीमुळे परीक्षेत विविध मार्गानी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकाराचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवित असतात. याच धर्तीवर विद्यार्थ्यांने परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करू नये, यासाठी गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यांस मंडळाच्या शिक्षासूचीनुसार होणारी कार्यवाही अवगत करणे आवश्यक आहे.

यासाठी विद्यार्थ्यासाठी असणारी तसेच शिक्षासूची उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर मागील बाजूस पृ.क्र.2 वर असणाऱ्या सुचना यांचे सामुहिक वाचन शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या समोर परीक्षेपूर्वी / प्रात्याक्षिक परीक्षा कालावधी करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस त्याची प्रत देण्यात यावी. सदर कार्यवाही केल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेवून सदरचा दस्ताऐवज शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे स्तरावर दप्तरी ठेवण्यात यावा. तसेच याबाबतचे प्रमाणपत्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाच्या ई–मेलवर पाठवावे. विद्यार्थ्यांसाठी शिक्षासूची, उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूच्या सूचना व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर करावयाचे प्रमाणपत्राचा नमुना, इत्यादी राज्यमंडळाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्द करण्यात येईल· तसेच शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचा लॉगीन आयडी वापरून डाऊनलोड करून घ्यावयाच्या आहेत. तेव्हा उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व प्रमाणपत्र मंडळास सादर करावे.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.